शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
७०८,आर बी कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.
संपर्क क्रमांक (०२०)२४४७८१२२ ईमेल :.arts.sportsdept@maa.ac.in

जा.क्र.राशैसंप्रपम/कला व क्रीडा /मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २०२६-२७/ दिनांक:- ११/०५/२०२६.

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक ( सर्व )
२. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, ( सर्व )
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ( सर्व )
४. शिक्षणाधिकारी प्राथमिक ,माध्यमिक, जि. प, न.पा. (सर्व)
५. शिक्षण निरीक्षक ( दक्षिण/उत्तर/पश्चिम/) बृहन्मुंबई.
६. प्रशासन अधिकारी, म.न.पा, न .पा. (सर्व)

**विषय : - मित्र उपक्रमाची अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०११ (२९६/११) माशि-३, दि. ५ आक्टोबर, २०११ आणि २७/०१/२०१२.
२)मा.प्रकल्प संचालक, म.प्रा .शि.प.मुंबई यांचे पत्र जा.क्र. मप्राशिप/सशिअ /व्यवस्थापन/प्रशिक्षण/२०१२-१३/१४३१,दि.२० एप्रिल,२०१२.
३) मा. आयुक्त ( शिक्षण ) म.रा. पुणे यांचे पत्र जा. क्र. शिक्षण आयुक्ता/ विप, स/२०२०-२१/४३,दि ०८डिसेंबर, २०२०.
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकीर्ण २०२६ प्र.क्र.७८ एस.डी. ४ दि. ८ मे, २०२६.

उपरोक्त विषय व संदर्भीय परिपत्रक क्र. १ नुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन व विपश्यना विशोधन संस्था, इगतपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने मित्र (MITRA-Mind In Training for Awareness)उपक्रम (आनापान साधना वर्ग) राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतून सुरु करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. संदर्भ क्र. २ नुसार सदर उपक्रमांतर्गत शालेय स्तरावर घ्यावयाच्या प्रशिक्षणाबाबत विस्तृतपणे मार्गदर्शन केले आहे. संदर्भ क्र. ३ नुसार या उपक्रमाचा आढावा घेऊन उपक्रम राबविताना येणाऱ्या अडचणी दूर करणेबाबत मार्गदर्शन केलेले आहे. सदर उपक्रमाबाबत विविध स्तरावरून वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करून योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या

आहेत. सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीत सर्व शिक्षक तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येक घटक सहभागी होत आहे. संदर्भ क्र. १ नुसार मित्र उपक्रमांतर्गत नेमलेल्या जिल्हास्तरीय समिती व तालुकास्तरीय समिती सदस्य सचिव म्हणून शिक्षणाधिकारी माध्यमिक व गटशिक्षणाधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक आहे. तसेच जिल्हास्तरीय समिती व तालुकास्तरीय समिती यांना नेमून देण्यात आलेल्या कामासंबंधी कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त संदर्भ क्रं. ५ नुसार मित्र (MITRA-Mind In Training for Awareness) उपक्रमांतर्गत ज्या शिक्षकांनी १० दिवसांचा विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेला नाही त्यांना ३ तासांचे आनापान प्रशिक्षण व ज्या शिक्षकांनी १० दिवसांचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे त्यांना ६ दिवसांचे प्रशिक्षण घेणेसंदर्भात आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
HEMANT VASEKAR
Date: 12-05-2026
15:59:39

(डॉ. हेमंत वसेकर भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

१. मा. प्रधान सचिव ,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. आयुक्त ( शिक्षण ), शिक्षण आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा. प्रकल्प संचालक ,म.प्रा.शि.प.,मुंबई.

**प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव सादर -**

१. आयुक्त म.न.पा. ( सर्व )
२. मुख्य कार्यकारी अधिकारी ( सर्व )
३. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे-०१.
४. शिक्षण संचालक, प्राथमिक, शिक्षण संचालनालय, पुणे-०१.